# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

**सरळसेवा भरती (अभियांत्रिकी विभाग, वर्ग - अ आणि वर्ग - ब)**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनेच्या अभियांत्रिकी विभागातील वर्ग-अ आणि वर्ग-ब मधील खालील संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडून **ऑनलाईन (Online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. रिक्त पदांचा तपशील, शैक्षणिक अर्हता, विहित केलेली वेतनश्रेणी, सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण नियुक्तीच्या अटी व शर्ती, ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर व मे.महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. (एमकेसीएल) या संस्थेच्या http://midc.erecruitment.co.in संकेतस्थळावर दि. १३/०८/२०१४ पासून ते दि. ०१/०९/२०१४ पर्यंत उपलब्ध आहेत.

**१) पदाचे नाव : कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग अ. पदसंख्या ६**

वेतनश्रेणी : पीबी-३- १५६००-३९१०० ग्रेड वेतन-६६००

अर्हता : १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदवी किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता .

२) स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदव्युत्तर पदवीधारकांसाठी संबंधित अभियांत्रिकी कामासाठी किमान ३ वर्षाचा अनुभव तसेच पदवीधारकांसाठी ७ वर्षाचा अनुभव.

**कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग अ**

| जातीचा प्रवर्ग | सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | आरक्षण विरहित (सर्वसाधारण) | |
| अनुसूचित जाती | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| इतर मागास वर्ग | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| **एकूण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **६** | **६** |

**२) पदाचे नाव : कार्यकारी अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग अ. पदसंख्या १ (खुला)**

वेतनश्रेणी : पीबी-३- १५६००-३९१०० ग्रेड वेतन-६६००

अर्हता : १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवी किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता.

२) यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदव्युत्तर पदवीधारकांसाठी संबंधित अभियांत्रिकी कामासाठी किमान ३ वर्षाचा अनुभव तसेच पदवीधारकांसाठी ७ वर्षाचा अनुभव

**कार्यकारी अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग अ**

| जातीचा प्रवर्ग | सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | आरक्षण विरहित (सर्वसाधारण) | |
| खुला प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** |

**३) पदाचे नाव : उप अभियंता (स्थापत्य) वर्ग अ. पदसंख्या २१**

वेतनश्रेणी : पीबी-३- १५६००-३९१०० ग्रेड वेतन-५४००

अर्हता : १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदवी किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता.

२) स्थापत्य अभियांत्रिकी विषयातील पदवीधारकांसाठी संबंधित अभियांत्रिकी कामामधील किमान ३ वर्षाचा अनुभव.

**उप अभियंता (स्थापत्य) वर्ग अ.**

| **जातीचा प्रवर्ग** | **सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे** | | | | | | **एकूण पद संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **माजी सैनिक १५%** | **प्रकल्पग्रस्त ५%** | **भूकंपग्रस्त २%** | **महिला ३०%** | **खेळाडू ५%** | **आरक्षण विरहित (सर्वसाधारण)** | |
| अनुसूचित जाती | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ |
| अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भटक्या जमाती (ब) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| इतर मागास वर्ग | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| **शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग** | १ | ० | ० | २ | ० | २ | ५ |
| विशेष मागास प्रवर्ग-(अ) | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| खुला प्रवर्ग | १ | ० | ० | २ | ० | ३ | ६ |
| **एकूण** | **२** | **०** | **०** | **७** | **०** | **१२** | **२१** |

**४) पदाचे नाव : उप अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग अ. पदसंख्या २**

वेतनश्रेणी : पीबी-३- १५६००-३९१०० ग्रेड वेतन-५४००

अर्हता : १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवी किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता .

२) यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवीधारकांसाठी संबंधित अभियांत्रिकी कामामधील किमान ३ वर्षाचा अनुभव

**उप अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग अ.**

| **जातीचा प्रवर्ग** | **सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे** | | | | | | **एकूण पद संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **माजी सैनिक १५%** | **प्रकल्पग्रस्त ५%** | **भूकंपग्रस्त २%** | **महिला ३०%** | **खेळाडू ५%** | **आरक्षण विरहित (सर्वसाधारण)** | |
| इतर मागास वर्ग | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग** | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **२** |

**५) पदाचे नाव : सहायक अभियंता (स्थापत्य) वर्ग ब. पदसंख्या २९**

वेतनश्रेणी : पीबी-२- ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४४००

अर्हता : स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी

**सहायक अभियंता (स्थापत्य) वर्ग ब.**

| जातीचा प्रवर्ग | सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | आरक्षण विरहित (सर्वसाधारण) | |
| अनुसूचित जाती | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनुसूचित जमाती | २ | १ | ० | ४ | १ | ४ | १२ |
| विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| भटक्या जमाती (क) | १ | ० | ० | १ | ० | २ | ४ |
| विशेष मागास प्रवर्ग | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | १ | ० | ० | २ | ० | २ | ५ |
| विशेष मागास प्रवर्ग-(अ) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला प्रवर्ग | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| **एकूण** | **४** | **१** | **०** | **१०** | **१** | **१३** | **२९** |

**६) पदाचे नाव : सहायक अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग ब. पदसंख्या २**

वेतनश्रेणी : पीबी-२- ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४४००

अर्हता : विद्युत / यांत्रिकी अभियांत्रिकी मधील पदवी

**सहायक अभियंता (विद्युत व यांत्रिकी) वर्ग ब.**

| जातीचा प्रवर्ग | सदर पदांपैकी समांतर आरक्षण निहाय पदे | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | आरक्षण विरहित (सर्वसाधारण) | |
| विमुक्त जाती (अ) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भटक्या जमाती (ड) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **२** |

**टीप : पदसंख्येत बदल होऊ शकतो.**

## नियुक्तीच्या अटी व शर्ती

**समांतर आरक्षण :-**

**अ) माजी सैनिकांसाठी :-** भूदल, नाविक दल व हवाईदल सेवेमध्ये सहा महिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल याप्रमाणे संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एमआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दिनांक १६/०३/१९९९ मधील तरतूदीनुसार माजी सैनिकांसाठी १५% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**ब) प्रकल्पग्रस्तांसाठी :-** प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**क) भूकंपग्रस्तः-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२ /०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भूकंपग्रस्तांना २ टक्के आरक्षण ठेवणेत आले आहे.

**ड) महिलांसाठी :-** महिलांची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२००/प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५/०५/२००१ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. महिला उमेदवार ही महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक. महिलांकरीता ३० टक्के समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**इ) खेळाडूंसाठी :- राज्याचे व राष्ट्राचे नाव उज्वल करणारे खेळाडू.** खेळाडूंची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधी-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ३०/०४/२००५ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. खेळाडूंसाठी ५ टक्के समांतर आरक्षण ठेवणेत आले आहे.

**कमाल व किमान वयोमर्यादा:- (अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक ०१/०९/२०१४रोजी)**

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान २१ व कमाल ३३ वर्ष.
२) मागास प्रवर्गासाठी किमान २१ व कमाल ३८ वर्षे.
३) प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अपंग उमेदवाराकरीता कमाल ४५ वर्षापर्यंत.
४) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू कमाल ३८ वर्षे (सर्वसाधारण) व मागासवर्गीय खेळाडूंचे कमाल ४३ वर्षे.
५) भूदल, नाविक दल व हवाईदल सेवेमध्ये सहा महिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल तर संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्षे हा कालावधी माजी सैनिकांचे वय मोजताना कमी करण्यात येईल.
६) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या झालेल्या सेवेच्या वर्षाइतकी किंवा ७ वर्षे यापैकी **कमी** असेल तेवढी वर्षे शिथिलक्षम राहील.
७) स्वातंत्र सैनिकांचे नाम निर्देशित पाल्य, जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना ४५ वर्षे.

**भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष :-**

उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येत असून ऑनलाईन पध्दतीने लेखी परिक्षा व मुलाखती घेणे आहे. गुणानुक्रमे / जात प्रवर्ग निहाय उमेदवारांची निवड करणे आहे.

सदर पदाकरिता लेखी परीक्षा दिनांक २१/०९/२०१४ रोजी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर इत्यादी केंद्रावर घेण्यात येईल त्याकरीता खालील विषय ठेवण्यात येतील.

| | |
|---|---|
| सामान्यज्ञान, सामान्य विज्ञान, चालू घडामोडी व औद्योगिक धोरण ई. | : २०० गुण |
| सबंधीत विषय ज्ञान परीक्षा | : २०० गुण |
| मौखिक चाचणी (तारीख स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल) | : ५० गुण |

लेखी **परिक्षेची रुपरेखा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर व** मे. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. (एमकेसीएल) **या संस्थेच्या** http://midc.erecruitment.co.in **संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार महामंडळाच्या सेवाप्रवेशासाठी लहान कुटूंबाचे नमुना-अ मधील प्रतिज्ञापन उमेदवाराने मुलाखतीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

**मराठी भाषेचे ज्ञान :-**

उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक राहील.

**भरती प्रक्रिया शुल्क :-**

वर्ग-अ **:** खुला प्रवर्ग रु. ९००/- मागासवर्गीय प्रवर्ग रु. ४५०/-
वर्ग-ब **:** खुला प्रवर्ग रु. ८००/- मागासवर्गीय प्रवर्ग रु. ४००/-

वरीलप्रमाणे भरती प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमुद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. **उमेदवारास एका पदापेक्षा जस्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व त्यासाठी स्वतंत्र भरती प्रक्रिया शुल्क भरावे लागेल. माजी सैनिकांना अर्जासोबत प्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**१) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील.
२) ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज
(a) www.midcindia.org व
(b) http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

**२) ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक:-**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कलावधी | दि.१३/०८/२०१४ | दि.०१/०९/२०१४ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)/ॲक्सिस बँक (Axis Bank) यांच्या शाखामध्ये फी स्वीकृतीचा कालावधी. | दि.१३/०८/२०१४ | दि.०३/०९/२०१४ |
| ३ | ज्या उमेदवाराने बँकेमध्ये दि. दि.०३/०९/२०१४ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरीत ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी. | दि.०५/०९/२०१४ पर्यंत. | |

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना MKCL या संस्थेच्या http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर व महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCL यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२) उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर (Website) Apply Online या लिंकवर क्लिक करावे व सर्व प्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registration) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

३) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form Number) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

४) त्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

५) या प्रिंट केलेल्या बँक चलनावर नमूद केलेली फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) कोणत्याही शाखेमध्ये वरील तक्त्यातील वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी. अर्जाची फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

६) स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) बँकेत फी भरल्यानंतर दुसऱ्या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरित अर्ज भरावा.

**७) उर्वरित अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचा नवीनतम (Latest) फोटो व स्वतःची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.**

८) उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेवून ती स्वतः जवळ ठेवावी.

९) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षा देण्यासाठी पात्र होईल.

१०) उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता मे. MKCL यांच्या कॉल सेंटर वरील दुरध्वनी क्रमांक **९३२६५५२५२५** वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

११) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी असल्यास नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

**महत्त्वाच्या सूचना :-**

१) **पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापुर्वी महामंडळाकडे नोकरीकरीता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

२) लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षा स्थळ MKCL यांच्या http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचा अर्ज क्रमांक संकेतस्थळावर नमूद करुन लॉगऑन केल्यानंतर प्रवेशपत्राची प्रिंट प्राप्त करुन घ्यावी.

**लेखी परीक्षेचे व मुलाखतीचे प्रवेशपत्र उमेदवारास पत्राव्दारे पाठविण्यात येणार नाही. उमेदवारांना परिक्षेची माहिती व पत्र व्यवहार महामंडळाच्या व मे. एमकेसीएल यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.**

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाव्दारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

४) सदरहू भरती प्रक्रियेत जो उमेदवार तोतयेगिरी करणे किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे किंवा कागदपत्रांमध्ये अनधिकृत फिरवाफिरवी करणे किंवा चूकीची किंवा खोटी माहिती भरणे किंवा महत्त्वाची माहिती दडवून ठेवणे ई. बाबी आढळून आल्यास त्याच्या विरुध्दच्या फौजदारी कार्यवाहीस पात्र असेल.

५) **मुळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.**

६) लेखी परीक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महामंडळाच्या www.midcindia.org व MKCL या संस्थेच्या http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

७) लेखी परीक्षा ही उमेदवारांच्या कोणतीही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर, व्यावसायीक चाचणी परीक्षा, मुलाखतीतील उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

८) राज्य शासनाच्या कोणत्याही सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असली तरी (उदा. जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र) वरील पदासाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

९) एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वत: जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

१०) लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी MKCL या संस्थेच्या http://midc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

११) उमेदवारांने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराचे चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१२) परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

१३) विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे.

१४) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जातीप्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

१५) महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करावेत. तथापि अन्य राज्यातून स्थंलातरीत झाले असल्यास महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१६) **महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र. ३५/मावक, दि. १५/०७/२०१४ अन्वये मराठा समाजातील उमेदवार शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backward Category (ESBC) या प्रवर्गातून आणि महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभागाचा शासन निर्णय क्र. अविवि २०१४/प्र.क्र.८१/का-७ दि. १९/०७/२०१४ अन्वये मुस्लिम समाजाकरीता विशेष मागास प्रवर्ग-(अ) (Special Backward Category-A) मधील समावेश असलेले उमेदवार आवश्यक जात प्रमाणपत्राच्या आधारे अर्ज करु शकतात.**

१७) **(अ)** इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, **शै.सा.मा.प्र.** (शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवग) व **विशेष मागास प्रवर्ग-अ** या मागास प्रवर्गातील उमेदवारांना

सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**(ब)** इमाव, भज-क, भज-ड, शै.सा.मा.प्र., विशेष मागास प्रवर्ग-अ आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

१८) अर्जासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील छोटया कुटूंबाचे व अर्जातील माहिती खरी असल्याचे प्रतिज्ञापन मुलाखतीपुर्वी उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

१९) मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२/१२/२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथः सदर उमेदवाराची या महामंडळातील सेवा समाप्त करण्यात येईल.

२०) मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमदेवारांना मुलाखतीच्या दिवशी खालील मूळ प्रमाणपत्र व त्यांच्या साक्षांकित प्रती (Attested Copies) या केंद्र / राज्यशासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक यांच्याकडून साक्षांकित करुन अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

- शैक्षणिक / व्यावसायीक / तांत्रिक अर्हता प्राप्त केलेली प्रमाणपत्रे / गुणपत्रिका.
- जातीचा दाखला / जात वैधता प्रमाणपत्र.
- वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला.
- अनुभवाचे प्रमाणपत्र.
- विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र.
- प्रकल्पग्रस्त असल्यास उमेदवाराचे नावे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र.
- लाहान कुटूंब असल्याचे व अर्जात भरलेली माहिती खरी असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन.
- अधिवास प्रमाणपत्र. (महाराष्ट्र राज्या बाहेरील उमदेवारांकरीता)
- याशिवाय उमेदवाराला जे-जे लागू होते त्या-त्या दाखल्यांच्या प्रती इ.

२१) जाहिरातीत दिलेली पद संख्या कमी-जास्त / बदल होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाच्या राज्यातील कोणत्याही कार्यालयात नेमणूका देण्यात येतील.

२२) निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळाचे नियम बंधनकारक राहतील. महामंडळाच्या सेवा विनियमात नमूद केलेल्या पदांना आवश्यक असणाऱ्या परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे उमेदवारास बंधनकारक असेल व सदर पदांच्या परीक्षेकरीता महामंडळाच्या सेवा विनियमात नमूद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

२३) सदर जाहिरातीत काही संभ्रम असल्यास या महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावरील जाहिरात ही अधिकृत समजण्यात येईल.

२४) **सदर भरती प्रक्रिया कोण्यात्याही टप्प्यावर पूर्णतः वा अशंतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.**

**महाव्यवस्थापक (मनुष्यबळ विकास)**
**मऔविम, मुंबई-९३.**

# <u>उमेदवारांने करावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

१) मला एक पेक्षा अधिक पती / पत्नी / नाही किंवा माझे अद्याप लग्न झालेले नाही. (नको असेल ते खोडावे)

२) माझेवर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा शिस्तभंगाची कारवाई झाली नाही किंवा चालू नाही.

३) मला स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कोणत्याही सरकारच्या सेवेतुन बडतर्फ / काढून टाकण्यात आले नाही. (कोणत्याही स्थानिक प्राधिकरणात आतापर्यंत सेवेत नसल्यास तसे नमूद करावे...............................)

मी------------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खरी व सत्य आहे. त्या पृष्ठयर्थ मी, प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास, माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल. तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस किंवा नियुक्ती रद्द होईल याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यासंबंधी महामंडळाची निवड समितीचा अथवा नियुक्ती प्राधिकरण यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. त्याबद्दल मी नोकरी गमावण्यास बंधनकारक राहील व त्यासंबधी माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :- आपला विश्वासू,

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी)

टिप :-

- वर नमुद केलेल्या लागू असणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. नको असेल ते खोडावे.
- अर्जातील सर्व तपशिल अचुक लिहिणे आवश्यक आहे. अर्ज अपुर्ण लिहिल्यामुळे आपला अर्ज अपात्र ठरवल्यास, त्याची जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही. आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कागदपत्र जोडू नयेत.

----------------------********************----------------

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापन) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार**

**प्रतिज्ञापन**

नमुना-अ
(नियम ४ पहा)

मी, श्री / श्रीमती / कुमारी.---------------------------------------- ------- श्री.-- ------------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नी, वय------- ----- वर्षे, राहणार---------------------------------------------------------------------------------- ------------------------- याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी-------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(अर्जदारांचे नाव)